# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः19.07.2024** **वारःशुक्रवार**

**ठळक बातम्या**

१. नीट युजीचा निकाल शहर आणि केंद्रनिहाय जाहीर करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे एनटीला निर्देश,

२. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचं प्रतीक असलेली वाघनखं साताऱ्यात दाखल; आज होणार शिवशस्त्रशौर्य गाथा दालनाचं उद्घाटन,

३. शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत गैरप्रकार खपवून घेणार नाही – मुख्यमंत्र्यांचा इशारा,

आणि

४. जालना जिल्ह्यात भाविकांच्या गाडीला अपघात; सात जणांचा मृत्यू.

**नीट**

नीट युजी 2024ही परीक्षा देणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा निकाल उद्या, म्हणजे शनिवारी दुपारी 12 वाजेपर्यंत जाहीर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय चाचणी संस्थेला दिले आहेत. नीट युजी परीक्षा गैरव्यवहार प्रकरणी दाखल झालेल्या 40 याचिकांची सुनावणी काल सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पीठासमोर झाली; त्यावेळी न्यायलयाने हे निर्देश दिले. विद्यार्थ्यांची ओळख जाहीर न करता, शहर आणि परीक्षा केंद्राच्या तपशिलासह निकाल संकेतस्थळावर जाहीर करावा, असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. 23 लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांचं भवितव्य या परीक्षेवर अवलंबून असल्याने ही परीक्षा रद्द करणं हा अखेरचा पर्याय असेल, असं न्यायालयानं स्पष्ट केलं. या प्रकरणी पुढची सुनावणी येत्या सोमवारी होणार आहे.

## वाघनखं

छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रतापगडावर केलेल्या शौर्याचं प्रतीक असलेली वाघनखं विशेष सुरक्षेत साताऱ्यात आणण्यात आली आहेत. त्याच्या पाहणीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार आज साताऱ्यात येणार असून त्यांच्या उपस्थितीत शिव शस्त्र शौर्य गाथा दालनाचं उद्घाटन होणार आहे. ही वाघनखं उद्यापासून सामान्य नागरिकांना पाहायला मिळतील.

## मुख्यमंत्री

नुकत्याच सादर झालेल्या अर्थसंकल्पातील महत्वाकांक्षी सात योजनांबाबत काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आढावा बैठक घेतली. जिल्हास्तरावर प्रत्येक योजनेसाठी समन्वय अधिकारी नियुक्त करा; तसंच या योजनांचा दर आठवड्याला आढावा घेण्यासाठी लाभार्थ्यांच्या याद्या युद्धपातळीवर तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण' कार्यक्रमासाठी शासकीय तसंच विविध प्राधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळानी पात्र उमेदवारांची तातडीने नोंदणी करावी असंही त्यांनी सांगितलं. या योजनांच्या अंमलबजावणीत गैरप्रकार झाल्यास तो खपवून घेतला जाणार नाही, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी दिला.

## विशालगड

विशाळगडावरील अतिक्रमण काढण्याबाबत आंदोलकांनी विविध घरांचं आणि प्रार्थनास्थळाचं नुकसान केलं; या नुकसानग्रस्त भागाची पाहणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल केली. विशाळगड अतिक्रमणाच्या बाबतीत नियमांच्या बाहेर जाऊन कोणावरही अन्याय केला जाणार नाही, असं पवार यांनी यावेळी सांगितलं. सध्या विशाळगडावरील फक्त व्यावसायिक अतिक्रमणे काढली जात आहेत, न्यायप्रविष्ट अतिक्रमणे सोडून इतर अतिक्रमणे पावसानंतर काढली जातील, असं पवार म्हणाले.

## पर्यटन

राज्याच्या पर्यटन धोरणामुळे अंदाजे 1 लाख कोटींची गुंतवणूक आणि 18 लाख रोजगार निर्मिती करण्यात येणार असल्याचं पर्यटनमंत्री गिरीश महाजन यांनी काल सांगितलं. आगामी 10 वर्षात पर्यटनस्थळांचा विकास करून पर्यटकांचा ओघ दुप्पट करण्याचं राज्य सरकारचं उद्दिष्ट आहे, असं महाजन म्हणाले. ग्रामीण आणि शहरी भागात पर्यटनाद्वारे प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करणं, विविध सवलती आणि पुरस्कारांच्या माध्यमातून कृषी पर्यटनाला प्रोत्साहन देणं, हा या धोरणाचा उद्देश आहे; या पर्यटन धोरणामुळे देशातलं "अग्रेसर राज्य" या श्रेणीत महाराष्ट्राचा समावेश होईल, असा विश्वास महाजन यांनी व्यक्त केला आहे.

## चाणक्य केंद्र

राज्यातील 1 हजार महाविद्यालयात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांची स्थापना करण्यात येणार असून यासाठी आत्तापर्यंत 1958 महाविद्यालयांनी अर्ज दाखल केले आहेत. आगामी काळात अधिक महाविद्यालयांना या उपक्रमात सामावून घेणार असल्याचं कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत सांगितलं. प्रत्येक कौशल्य विकास केंद्रात दर वर्षी साधारण दीडशे युवक-युवतींना कौशल्य विकासाचं मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पुढच्या महिन्यापासून हे प्रशिक्षण सुरू होईल, 15 ते 45 वयोगटातील सर्व युवक-युवती यासाठी पात्र आहेत, असं लोढा म्हणाले.

## नक्षलवादी ठार

गडचिरोली मधील वांडोली गावानजीकच्या जंगल परिसरात बुधवारी झालेल्या चकमकीत पोलिसांनी 12 नक्षलवाद्यांना कंठस्नान घातलं. या कारवाईनंतर गडचिरोलीत सक्रिय नक्षलवाद्यांच्या दोन दलमचा संपूर्ण नायनाट झाल्याचं पोलिस अधिक्षक नीलोत्पल यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं. नक्षलवादी 28 जुलै ते 3 ऑगस्ट शहीद सप्ताह साजरा करतात, त्या अनुषंगानं हिंसक कारवाया करण्यासाठी ते  एकत्र आल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती; त्यानंतर पोलिसांनी हे नक्षलविरोधी अभियान राबवलं.

## अंतरसिंग आर्या

राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाचे अध्यक्ष अंतरसिंग आर्या कालपासून दोन दिवसांच्या नंदुरबार जिल्हा दौऱ्यावर आहेत. काल त्यांनी आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित यांची भेट घेतली तसंच सामाजिक संघटना आणि  आदिवासी बांधवांच्या तक्रारी जाणून घेतल्या आणि त्यांना मार्गदर्शन केलं.

## स्पार्क

केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी मंत्रालयामार्फत राबवण्यात येत असलेल्या दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानात 2023-2024 या वर्षात उत्कृष्ट काम केल्याबद्दल नाशिक महापालिकेला राष्ट्रीय स्तरावरील तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार काल प्रदान करण्यात आला. केंद्रीय गृहनिर्माण मंत्री मनोहर लाल यांच्या हस्ते हा पुरस्कार महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

**खेडकर**

प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांची आई मनोरमा खेडकर यांना काल सकाळी पुणे ग्रामीण पोलिसांनी महाड इथल्या एका खाजगी हॉटेलमधून ताब्यात घेतलं. एका शेतकऱ्याची जमीन बळकावून त्याला पिस्तूलाचा धाक दाखवून धमकावल्या प्रकरणी मनोरमा आणि इतर 5 जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुण्यातील न्यायालयानं मनोरमा खेडकर यांना 3 दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

**मृत्यू**

रायगड जिल्ह्यातील कुंभे धबधब्यावर पर्यटनासाठी आलेल्या अन्वी कामदार हिचा रील्स करताना पाय घसरल्याने दरीत पडून मृत्यू झाला; या दुर्घटनेनंतर पोलीस प्रशासनाने कठोर पावलं उचलायला सुरूवात केली आहे. पोलीस प्रशासनानं धबधबे, नदी, धरण, डोंगर परिसरात जीव धोक्यात घालणारी हुल्लडबाजी (स्टंटबाजी) करण्याबाबत प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. या आदेशांचं उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिला आहे.

**जालना अपघात**

पंढरपूरहून विठुरायाचं दर्शन घेऊन गावाकडे परत जात असलेल्या भाविकांची गाडी चालकाचं नियंत्रण सुटल्याने रस्त्यालगतच्या विहिरीत जाऊन कोसळली. या भीषण अपघातात सात भाविकांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. तर सातजण जखमी झाले. यातले दोघे गंभीर आहेत. जालना-राजूर मार्गावरील तुपेवाडी फाट्याजवळ काल संध्याकाळी हा अपघात झाला.

**कबड्डी**

पुण्यात सुरू असलेल्या 71 व्या राज्य अजिंक्यपद कबड्डी निवड चाचणी स्पर्धेत काल नंदुरबार संघाने कोल्हापूर संघावर 31-24 अशी मात करीत उपांत्य फेरीत प्रवेश केला. पुणे शहर संघाच्या तेजस पाटील, शुभम शेळके  यांनी चौफेर हल्ला करीत पालघर संघाचे आव्हान 60-44 असे मोडीत काढत उपांत्य फेरीतील आपले स्थान पक्के केले. याशिवाय अत्यंत अटितटीच्या तिसऱ्या सामन्यात पुणे ग्रामीण संघाने मुंबई उपनगर पुर्व संघावर 37- 33 अशी मात केली. अहमदनगर संघही उपांत्य फेरीत दाखल झाला आहे.

**मुसळधार**

रत्नागिरी जिल्ह्यात एक दिवसाच्या विश्रांतीनंतर कालपासून पुन्हा एकदा पावसानं जोर धरला आहे. जगबुडी आणि काजळी नद्या इशारा पातळीच्या वरुन वाहत आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यातही मुसळधार पाऊस सुरू असून सर्व नद्या दुथडी भरून वाहत असून तेरेखोल नदी इशारा पातळीवरून वहात आहे. त्यामुळं नदीकाठच्या लोकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**हवामान**

राज्यात येत्या 24 तासात बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता असून, तुरळक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार पाऊस पडेल, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**